# ग्रामसभा: महिलांचा वाढता सहभाग, प्रश्नांची खुली चर्चा

“आम्ही ग्रामसभेला जाणार…” हा मेळाव्यात महिलांनी केलेला निर्धार १५ ऑगस्टच्या ग्रामसभांमध्ये प्रत्यक्षात उतरलेला दिसला! पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर तालुक्यांसह नाशिक जिल्ह्यातल्या अन्य काही गावांमध्ये यावेळी झेंडावंदन आणि ग्रामसभेला महिलांची उपस्थिती आणि चर्चेतला सहभाग वाढल्याचे दिसले.




या बदलाची सुरुवात काही महिने आधी सुरु झाली. गावोगावी महिलांच्या बैठका व मेळावे घेण्याचे सत्र प्रगती अभियानने सुरु केले. त्यातून ग्रामसभा, महिला सभा, ग्रामपंचायत निधी, कामांचे अग्रक्रम यांची चर्चा झाली. महिलांच्या प्राधान्यक्रमाचे प्रश्न कोणते आणि ते ग्रामसभेत कसे मांडायचे हे महिलांनी समजून घेतले आणि आपल्या मागण्या, मुद्दे घेऊन त्या ग्रामसभेला जाऊ लागल्या.

**‘ग्रामसभेआधी महिला सभा घ्या!’**

या बदलांची झलक २६ जानेवारीच्या ग्रामसभेपासूनच दिसू लागली. पेठ तालुक्यातल्या शिंगदरी जानेवारीच्या ग्रामसभेला महिला सभेचे रूप आले होते! जमलेल्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांचीच संख्या जास्त होती. ग्रामसभेआधी महिला सभा घेण्याची मागणी यावेळी महिलांनी मांडली.

काही गावामध्ये महिलांनी रोजगाराच्या मुद्द्यावर भर दिला. शेतीचा हंगाम संपल्यानंतर अनेक कुटुंबांना मजुरीसाठी बाहेरगावी जावे लागते, हे स्थलांतर थांबावे, गावातच रोजगाराच्या संधी हव्यात, ही अपेक्षा महिलांनी व्यक्त केली. त्यासाठी नवी कौशल्ये शिकण्याची तयारी त्यांनी दाखवली.

त्र्यंबकेश्वर तालुक्यातल्या अस्वली हर्षच्या ग्रामसभेत महिलांनी पाण्याचा प्रश्नावर चर्चा केली. गावात जल जीवन मिशनअंतर्गत पाइपलाइन, विहीर आणि मोटार सगळी यंत्रणा उभारली असूनही घरापर्यंत पाणी का मिळत नाही, हे

विचारले.  चर्चेतून योजनेतल्या त्रुटी समोर आल्या. प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने दोन पावले टाकली गेली असली तरी अजून पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही. त्यासाठी महिलांचा पाठपुरावा चालूच आहे.

**पाण्याचा प्रश्न: महिलांचा प्राधान्यक्रम**



ऑगस्टच्या ग्रामसभेपर्यंत महिलांच्या अपेक्षा आणि उत्साह आणखी वाढला.  १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत विविध प्रश्नांची चर्चा झाली, पण महिलांना पाण्याचा प्रश्न पुन:पुन्हा मांडावा लागला. काही ठिकाणी जल जीवन मिशनची अंमलबजावणी झाली असली, तरी ती अपूर्ण वा सदोष असल्याने अद्याप घरांपर्यंत पाणी पोहोचलेले नाही. जिथे पाणी मिळते, तिथेही ते पिण्यायोग्य असेलच असे नाही. त्यामुळे महिलांच्या डोक्यावरचा हंडा अजून उतरलेला नाही.

हिरडी गावात पुलाच्या बांधकामाचा प्रस्ताव होता. त्याला आक्षेप घेत महिलांनी “पुलाच्या आधी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवा” असे म्हणून आपला अग्रक्रम स्पष्ट केला.

आणखी एका गावात शेतकऱ्यांनी शेतीसाठी उपयोगी ठरणाऱ्या विहिरीतला गाळ काढण्याची मागणी केली होती. तर महिलांनी पिण्याच्या पाण्याची विहीर स्वच्छ करून ती टाकीला जोडण्याची मागणी केली.

**लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा**

स्त्रिया-पुरुष आणि शिक्षक, स्थानिक कर्मचारी अशा सर्वांच्या सहभागाने जिथे ग्रामसभा झाल्या तिथे खुलेपणाने अनेक विषयांवर चर्चा झाल्या. आहारापासून शिक्षणापर्यंत आणि पाण्यापासून रस्त्यांपर्यंत सर्व जिव्हाळ्याचे विषय समोर आले.

रेशनवर मका दिला जातो, त्यावर काही गावातील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. अंगणवाडीत अमृताहार म्हणून दिले जाणारी रेडी-टू-कुक खिचडी मिश्रण अजिबात खाण्यायोग्य नसल्याची तक्रार बहुतेक गावातू पुढे आली. चव आणि गुणवत्ता दोन्ही बाबतीत लोकांना नापसंत असलेला आहार तरीही चालूच आहे, जनावरेही तो खात नाहीत, अन्नाची नासाडी मात्र होते, असे लोकांनी आवर्जून मांडले. केंद्र, राज्य सरकारच्या अखत्यारितले हे विषय असले तरी ज्यांच्यासाठी या योजना आहेत त्यांचे ग्रामसभेच्या माध्यमातून व्यक्त झालेले मत लक्षात घेण्यासारखे आहे.

सर्व बाजूंनी विचार न करता राबवलेल्या योजनांचे परिणामही अनपेक्षित आणि विपरित असू शकतात! महिलांना रोजगार मिळावा म्हणून केलेल्या शेळीवाटप केले, त्याचा अनुभव एका गावातल्या ग्रामसभेत चर्चेला आला. महिलांवर आधीचाच कामाचा बोजा, शेळ्या आल्यामुळे तो आणखी वाढला. मग शेळ्यांना राखण्याची जबाबदारी घरातल्या मुला-मुलींवर आली. परिणामी मुले शाळेऐवजी रानात जाऊ लागली. शाळेतली उपस्थिती अनियमित झाली. शिक्षकाच्या निरीक्षणातून पुढे आलेल्या या मुद्द्याने सगळ्यांनाच विचारात पाडले.

दुसऱ्या एका गावात शिक्षकांनी मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रश्न मांडला. शाळेत जेवणानंतर मुलं शौचाला जायचं म्हणतात, त्यांना सकाळीच पोट साफ करायची सवय पालकांनी लावायला पाहिजे, असं शिक्षकांचं म्हणणं होतं. पण मुद्दा सवयीचा नव्हता, शाळेतल्या पाण्याच्या अस्वच्छतेचा होता. एका वयस्कर नागरिकानं म्हटलं तुम्ही शाळेची पाण्याची टाकी स्वच्छ करून घ्या, पाण्याची गुणवत्ता तपासा, त्यांचं म्हणणंही योग्यच होतं.




काही गावात तरूण मंडळीही ग्रामसभेत हजर होती आणि चर्चेत बोलतंही होती. एका गावातील तरुणांनी अंगणवाडीच्या निरीक्षणातून दिसलेल्या गोष्टी मांडल्या. मुले-महिलांसाठी अंगणवाडीत पोषक आहार येतो, पण तो साठवण्याची व्यवस्था नसते. गावातली अंगणवाडीची इमारत जुनी आहे, छत गळते, भिंतींना ओल येते, अन्नाची पोती नुसती रचून ठेवली तर ती खराब होतात. साठवणुकीची नीट व्यवस्था असायला पाहिजे, असं त्यांनी मांडलं. गावकऱ्यांनी शाळा व अंगणवाडीतल्या त्रुटी लक्षात घेतल्या, त्यावर चर्चा केली, हे महत्त्वाचेच आहे.

गावातले विविध वयोगटातले स्त्री-पुरुष जमून चर्चेत सहभागी होतात तेव्हाच ग्रामसभा अधिक अर्थपूर्ण होतात. ऑगस्टच्या ग्रामसभेत लोकांनी त्यांचे अनुभव आणि प्रश्न मोकळेपणाने मांडले. आलेल्या विषयातही विविधता आहे. चर्चेतून प्राधान्यक्रम ठरवता येतात, उत्तरे सापडतात. महिलांच्या सहभागाने या प्रक्रियेला नवी आणि आशादायी दिशा मिळत आहे. अर्थात या सगळ्याचा पाठपुरावाही तितकाच महत्त्वाचा आहे. दोन ग्रामसभांच्या दरम्यान या विषयांवरील चर्चा जिवंत ठेवणे, ठरलेल्या गोष्टींच्या कार्यवाहीकडे लक्ष देणेही गरजेचे आहे, हेही आता लक्षात येत आहे.

— —